# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.06.2025** **वारःरविवार**

---

आकाशवाणी, विजयालक्ष्मी साळवी आपल्याला बातम्या देत आहे...

ऑपरेशन सिंदूर भारतीय महिलांच्या शक्तिचं प्रतिक ठरल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त राज्यभरात अभिवादन
देशभरात आज पंचविसाव्या फिट इंडिया संडेज ऑन सायकल उपक्रमाचं आयोजन
चीन आशियातील शक्ती संतुलन बदलण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याची तयारी करत असल्याचा अमेरिकेचा दावा
बहात्तराव्या मिस वर्ल्ड स्पर्धेत मिस थायलंड ओपल सुचाता चुआंगश्री ठरली मिस वर्ल्ड 2025 आणि
आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताला दुसरं स्थान

**<u>पंतप्रधान</u>**

पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा भारताच्या महिला शक्तीला आव्हान होता आणि तो गुन्हेगारांसाठी मृत्युदंड ठरल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ इथल्या जांबूरी मैदानात लोकमाता देवी अहिल्याबाई यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त आयोजित महिला सक्षमीकरण महासंमेलनाला संबोधित करताना मोदी बोलत होते. ऑपरेशन सिंदूर ही भारताच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात मोठी यशस्वी मोहीम असून भारत कोणत्याही प्रकारचं छुपं युद्ध सहन करणार नाही आणि अशा दहशतवादी कृत्यांना कडक प्रत्युत्तर देण्यासाठी देश कटिबद्ध असल्याचं ते म्हणाले.
यावेळी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा उल्लेख करताना, पंतप्रधानांनी लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्शांवर आधारित असलेल्या जनकल्याणकारी योजनांवर प्रकाश टाकला. प्रशासनात सरकार "नागरिक देवो भव" या मंत्राचं पालन करत असल्याचं तसंच महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला राष्ट्रीय प्रगतीचा पाया बनवल्याचा उल्लेख त्यांनी केला.

आज सरकार का प्रयास है कि आधुनिक टेक्नॉलॉजी में भी हमारी बहनें, हमारी बेटियां आगे बढ़कर के नेतृत्व दें। अब जैसे आज खेती में ड्रोन क्रांति आ रही है। इसको हमारी गांव की बहनें ही नेतृत्व दे रही हैं आज बहुत बड़ी संख्या में हमारी बेटियां वैज्ञानिक बन रही हैं, डॉक्टर-इंजीनियर और पायलट बन रही हैं आज जितने भी हमारे बड़े स्पेस मिशन हैं, उनमें बड़ी संख्या में वैज्ञानिक के नाते हमारी माताएं-बहनें-बेटियां काम कर रही हैं।

या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केलं. याचवेळी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी, एक स्मारक टपाल तिकिट आणि 300 रुपयांच्या नाण्याचं अनावरणही करण्यात आलं. संस्कृती विभागानं आयोजित केलेल्या सुशासन, महिला सक्षमीकरण आणि लोकमाता अहिल्याबाईंशी संबंधित सांस्कृतिक वारशासाठी समर्पित प्रदर्शनालाही त्यांनी भेट दिली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातल्या चौंडी इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केलं. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि इतर मंत्रीगण उपस्थित होते. देशभरात दिल्लीसहित राज्यात नवी मुंबई, सांगली, पुणे, परभणी,नांदेडसह इतर जिल्ह्यातही अहिल्यादेवींची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

**<u>फिट इंडिया</u>**

फिट इंडिया संडेज ऑन सायकल उपक्रमाची 25 वी आवृत्ती आज देशभरात एक विशेष तिरंगा रॅली म्हणून साजरी केली जाणार आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय राष्ट्रीय राजधानीतून या विशेष आवृत्तीचे नेतृत्व करतील. ऑलिंपिक पदक विजेता योगेश्वर दत्त, आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सरिता मोर, अभिनेत्री शर्वरी आणि माजी क्रिकेटपटू आणि निवडकर्ता साबा करीम यांच्यासह क्रीडा आणि मनोरंजन क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती या कार्यक्रमात सहभागी होतील.

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने एका निवेदनात सांगितलं की, 3 जूनला होणाऱ्या जागतिक सायकल दिनामुळे, आजचा कार्यक्रम केवळ शारीरिक तंदुरुस्तीमध्ये सायकलिंगच्या मोठ्या भूमिकेचा संदेशच नाही तर भारताच्या सशस्त्र दलांसाठी सामूहिक आदरांजली म्हणूनही महत्वाचा आहे. देशभरातील दोन हजारांहून अधिक ठिकाणी आज सायकल दिन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>नागालँडएनसीपी</u>**

नागालँडमध्ये मोठ्या राजकीय घडामोडींत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सातही आमदार सत्ताधारी पक्ष डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षामध्ये सामील झाले आहेत. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची संख्या 32 झाली आहे. संसदीय कामकाज मंत्री आणि एनडीपीपी पक्षाचे वरिष्ठ नेते केजी केन्ये यांनी काल वार्ताहरांना ही माहिती दिली. या आमदारांनी विलीनीकरणाचा अर्ज विधानसभा अध्यक्षांकडे सादर केल्याचं केन्ये यांनी सांगितलं.

**<u>शिष्टमंडळे</u>**

भारताच्या दहशतवाद विरोधी शून्य सहिष्णुता धोरणाच्या वचनबद्धतेला जागतिक पातळीवर पोहोचवण्यासाठी दौऱ्यावर असलेल्या सात बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी एक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळेच्या

नेतृत्वाखालील शिष्टमंडळ काल इथिओपियाच्या दौऱ्यावर पोचले. शिष्टमंडळाने स्थानिक भारतीय समुदायाशीही संवाद साधला. भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ लंडनमध्ये तर द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ स्पेनमधील माद्रिद येथे पोहोचले. भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने अल्जियर्समधील भारतीय समुदायाशी संवाद साधला.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी तैवानला चीनकडून लवकरच धोका निर्माण होणार असल्याचा इशारा दिला आहे. सिंगापूरमधील शांग्री-ला संवादात बोलताना हेगसेथ यांनी इशारा दिला की चीन आशियातील अनेक भागांवर वर्चस्व गाजवण्यासाठी आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या आशेनं एक वर्चस्ववादी शक्ती बनण्याचा प्रयत्न करीत आहे. अध्यक्ष शी जिनपिंग यांनी तैवानवर आक्रमण करण्यासाठी चिनी सैन्याला 2027 पर्यंतची अंतिम मुदत दिली आहे असा दावा करून, अमेरिकेच्या संरक्षण सचिवांनी आशियाई देशांना संरक्षण खर्च वाढवण्याचं आणि युद्ध रोखण्यासाठी अमेरिकेसोबत काम करण्याचं आवाहन केलं. चीन आशियातील शक्ती संतुलन बदलण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याची तयारी करत असल्याचा दावाही त्यांनी केला.

**<u>हमास-युद्धबंदी</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मध्य पूर्वेतील राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांनी मध्यस्थांना सादर केलेल्या इस्रायल समर्थित युद्धबंदी प्रस्तावाला हमासनं प्रतिसाद दिला आहे. काही पॅलेस्टिनी कैद्यांच्या बदल्यात 10 जिवंत इस्रायली बंधक आणि 18  मृत बंधकांना सोडण्यास आपण तयार असल्याचं हमासनं म्हटलं आहे. हमासनं प्रस्तावित युद्धबंदी योजनेत बदल करण्याची मागणीही केली आहे.

**<u>मिस वर्ल्ड</u>**

हैदराबाद इथं काल रात्री झालेल्या बहात्तराव्या मिस वर्ल्ड स्पर्धेत मिस थायलंड ओपल सुचाता चुआंगश्री हिला मिस वर्ल्ड 2025  चा किताब देण्यात आला. इथिओपियाची हॅसेट डेरेजे अदमासू ही पहिली उपविजेती आणि पोलंडची माजा क्लाज्दा ही दुसरी उपविजेती ठरली. फुकेतची 22 वर्षीय सुचातानं आत्मविश्वास आणि महिलांच्या आरोग्याविषयीच्या जागरूकतेमुळं वेगळा ठसा उमटवला. जगभरातील 100  हून अधिक स्पर्धकांनी यात भाग घेतला.

**<u>एनआयए-शोध-मोहिम</u>**

राष्ट्रीय तपास संस्थेनं  पाकिस्तानशी संबंधित हेरगिरी प्रकरणात आठ राज्यांमधील १५ ठिकाणी शोध मोहीम राबवली आहे. दिल्ली, मुंबई, हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, आसाम आणि पश्चिम बंगालमधील पाकिस्तान इंटेलिजेंस ऑपरेटिव्हशी संबंधित संशयितांच्या ठिकाणी शोध मोहीम राबवण्यात आली असं एनआयएनं एका निवेदनात सांगितलं. शोध मोहिमेदरम्यान अनेक इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि संवेदनशील आर्थिक कागदपत्रं तसंच इतर गुन्हेगारी साहित्य जप्त करण्यात आलं. एनआयएच्या तपासानुसार, संशयितांचे पाकिस्तानी कार्यकर्त्यांशी संबंध होते आणि ते भारतात हेरगिरी कारवाया करण्यासाठी आर्थिक मदत करणारे म्हणून काम करत होते.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएलच्या दुसऱ्या पात्रता सामन्यामध्ये पाच वेळा विजेता मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात आज अहमदाबाद इथं सामना होणार आहे. या सामन्यातील विजेता मंगळवारी त्याच ठिकाणी अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसोबत भिडेल. पंजाबला प्रथमच विजेतेपद जिंकण्याची संधी आहे.

**<u>आशियाई-ॲथलेटिक्स</u>**

दक्षिण कोरियातील गुमी इथं झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं 24 पदकांसह पदकतालिकेत दुसरं स्थान पटकावलं. भारतानं आठ सुवर्ण, 10 रौप्य आणि सहा कास्यपदकं जिंकली. अनिमेश कुजूर आणि पारुल चौधरी यांनी या स्पर्धेत नवे राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी काल भारतानं 3 रौप्य आणि 3 कास्यपदकं जिंकली. महिलांच्या 4 गुणिले 100 मीटर शर्यतीत, श्रावणी नंदा, अभिनया राजराजन, स्नेहा एसएस आणि नित्या गंधे यांच्या भारतीय संघानं रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या 5000 मीटर अंतिम फेरीत, पारुल चौधरीनं रौप्यपदक जिंकलं, तर सचिन यादवनं पुरुषांच्या भालाफेकीत रौप्यपदक जिंकलं. पूजानं महिलांच्या 800 मीटर अंतिम फेरीत, तर अनिमेश कुजूरनं 200 मीटर स्पर्धेत आणि विद्या रामराजनं 400 मीटर अडथळा स्पर्धेत कास्यपदक जिंकलं.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, ईशान्य भारतातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. दिल्लीसह, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा आणि चंदीगड इथं पुढील तीन दिवस वादळ, जोरदार वाऱ्यांसह हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर विदर्भ, छत्तीसगड, गंगीय पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, मध्य प्रदेश, बिहार, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह तुरळक ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.